POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२३२ ● मुंबई, गुरुवार, २६ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईतील मालमत्ता कराच्या वसुलीसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईमधील मालमत्ता कराच्या वसुलीसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम १५४ मध्ये सुधारणा करण्यास विधानसभा व विधान परिषदेने मंजुरी दिली आहे. या सुधारणेमुळे रहिवासी मालमत्ताधारक व व्यावसायिक मालमत्ताधारक यावर कोणताही करभार वाढणार नाही. परिणामी निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारकांना दिलासा मिळणार आहे. जमिनीचे कर निर्धारण चटई क्षेत्र निदेर्शांक वगळून केले जाणार आहे. त्यामुळे रखडलेल्या आणि सध्या सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांना गती मिळणार आहे. यामुळे आता मालमत्ता कराची आकारणी करणे सुरळीत होणार आहे.

या विधेयक मान्यतेमुळे संपूर्ण मुंबईतील सुमारे साडेदहा लाख मालमत्तांचे सन २०१० पासून पुनर्करनिर्धारण करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत व उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे यांना आळा बसणार आहे. उच्च न्यायालयाने सन २०१४ च्या अंतरिम आदेशानुसार जे मालमत्ताधारक मालमत्ता कराच्या ५० टक्के रक्कम कर भरणा करत होते, त्या मालमत्ताधारकांकडून कलम १५४ मध्ये




सुधारणा झाल्यामुळे उर्वरित ५० टक्के रक्कम कर वसुली करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी महानगरपालिकेच्या मालमत्ताकरासह राज्य शासनाच्या प्रलंबित कराची वसुली होऊन महसुल प्राप्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई महापालिकेच्या वतीने सन २०१० मध्ये भांडवली मूल्य आधारित कर आकारणी करताना बिल्टअप वरकराचे आकारणी केली जात होती. या या विरोधात काही करदाते न्यायालयात गेले होते.त्यानंतर कार्पेटवर क्षेत्राफळावर आधारित कराची आकारणी करण्याची मागणी केली होती. याबाबतचे न्यायालयीन प्रकरण न्यायालयात प्रलंबित होते. या दरम्यान त्यांना ग्राहक ५० टक्के कराची भरणा करत होते.

### मुंबईत आतापर्यंत सुमारे ८८ टक्के मालमत्ता कर वसुली

मंगळवार २४ मार्च २०२६ पर्यंत एकूण ६ हजार ४४९ कोटी रुपये म्हणजेच निर्धारित उद्दिष्टाच्या ८७.८६ टक्के इतका मालमत्ता कर जमा झाला असून मालमत्ताधारकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत करभरणा करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, थकबाकी असलेल्या सर्व मालमत्ताधारकांनी तसेच चालू आर्थिक वषार्चा करभरणा न केलेल्या मालमत्ताधारकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी करभरणा करून दंडात्मक कारवाई टाळावी असे आवाहन अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी केले आहे. दरम्यान, मालमत्ताधारकांना विहित वेळेत मालमत्ता करभरणा करता यावा, यासाठी सार्वजनिक सुटी व साप्ताहिक सुटीच्या दिवशीही नागरी सुविधा केंद्र सुरू राहतील, असेही त्यांनी सांगितले. मालमत्ता करासंदर्भात महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी आढावा बैठक पार पडली. त्यावेळी डॉ. जोशी बोलत होत्या. सहायक आयुक्त (करनिर्धारण व संकलन) डॉ. गजानन बेल्लाळे यांच्यासह परिमंडळीय उपकरनिर्धारक व संकलक तसेच सर्व प्रशासकीय विभागांचे सहायक करनिर्धारक व संकलक यावेळी उपस्थित होते. मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभाग (वॉर्ड) अंतर्गत आतापर्यंत संकलित झालेला मालमत्ता कर आणि थकबाकीचा बैठकीत आढावा घेण्यात आला. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा तसेच थकीत मालमत्ता कर दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी न जमा केल्यास संबंधित मालमत्ताधारकांविरोधात महानगरपालिकेकडून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. निश्चित केलेल्या ध्येयानुसार कर संकलन करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. तसेच, थकीत करभरणा न करणाऱ्या मालमत्तांवर तत्काळ अटकावणी आणि जप्तीची कारवाई करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. मालमत्ताधारकांनी दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत करभरणा करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, थकबाकी असलेल्या सर्व मालमत्ताधारकांनी तसेच चालू आर्थिक वषार्चा करभरणा न केलेल्या मालमत्ताधारकांनी दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी करभरणा करून दंडात्मक कारवाई टाळावी. तथापि, मालमत्ताधारकांना विहित वेळेत मालमत्ता करभरणा करता यावा, यासाठी सार्वजनिक सुटी व साप्ताहिक सुटीच्या दिवशी म्हणजे दिनांक २६, २८ व २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत तसेच दिनांक ३० आणि ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री १२ वाजेपर्यंत नागरी सुविधा केंद्र (सीएफसी) सुरू राहतील, असेही डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले.

## जेएनपीए बंदरात बाओफेंग वॉकी टॉकी जप्त
## डीआरआयची मोठी कारवाई




**■उरण। प्रतिनिधी,**

नवी मुंबईतील जेएनपीए बंदरावर महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) मोठी कारवाई केली आहे. सुरक्षेला धोका निर्माण करू पाहणारे आणि भारतात काळ्या यादीत टाकण्यात आलेले चिनी बनावटीचे ''बाओफेंग' वॉकी-टॉकी संच' डीआरआयने जप्त केले आहेत. या कारवाईत ९.२५ कोटी रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त केला. या प्रकरणी दोघांना सीमाशुल्क कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. चीनमधून आलेल्या आणि विविध इलेक्ट्रॉनिक्स साहित्याची चुकीची माहिती देऊन मागवलेल्या आठ कंटेनर्सना बंदरावर रोखण्यात आले. या संपूर्ण शिपमेंटची एकूण किंमत सुमारे ३०.२५ कोटी रुपये आहे. यात २१ कोटी रुपयांच्या इतर संकीर्ण इलेक्ट्रॉनिक साहित्याआड हा प्रतिबंधित माल लपवून आणण्यात आला होता.

दूरसंचार विभागाने चिनी वॉकी-टॉकी मॉडेलला भारतात काळ्या यादीत टाकले. ही उपकरणे फ्रिक्वेन्सी मर्यादेपलीकडे जाऊन काम करतात. या उपकरणांच्या वापरासाठी भारतात विशेष परवान्याची आवश्यकता असते. तसेच, जुन्या किंवा सेकंड-हॅन्ड हार्ड डिस्क भारतात आयात करण्यासाठी परकीय व्यापार महासंचालनालयाच्या पूर्वपरवानगीची गरज असते. मात्र, परवाना न घेता नियम धाब्यावर बसवून ही आयात केली जात होती.

**जप्त करण्यात आलेल्या मालाचा तपशील:**

- **बाओफेंग 'बीएफ-८८८एस' वॉकी-टॉकी :** ११ हजार ६० वॉकी-टॉकी संच जप्त (किंमत रु. २.५ कोटी).
- **जुन्या हार्ड डिस्क :** ई-कचरा प्रवर्गातील सेकंड-हॅन्ड हार्ड डिस्क जप्त (किंमत रु. ६.७५ कोटी).

## मुंबई, कोकण ते विदर्भ... उन्हाचा तडाखा अन् पावसाचा इशारा, 12 राज्य वादळाच्या हिटलिस्टवर

**■मुंबई। प्रतिनिधी,**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील 24 तासांमध्ये कोकणासह मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये दुपारच्या वेळी उन्हाचा तडाखा वाढण्याचा अंदाज आहे. ज्यामुळं भर दुपारी घराबाहेर पडणाऱ्यांनी उष्णतेपासून बचाव करण्यासाठीचे उपाय योजावेत असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

दरम्यानच्या काळात हवेतील आर्द्रतेचं प्रमाण अधिक राहणार असून त्यामुळं यलो अलर्टसुद्धा जारी करण्यात



आला आहे. विदर्भातसुद्धा पारा वाढण्यास सुरुवात झाली असून, त्यातच वादळी पावसाचाही इशारा कायम आहे. ज्यामुळं उन्हाळ्यातही हवामात होणाऱ्या या बदलांनी चिंतेत भर घातली आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यातही मेघगर्जनेसह पावसाचा इशारा आहे, तर उर्वरित राज्यात पावसाचा इशारा असला तरीही उष्मा मात्र त्यावर सरशी करताना दिसेल असं पूवार्नुमान आहे. मध्य महाराष्ट्रासह नजीकच्या भागापासून तामिळनाडू आणि कर्नाटकापर्यंत चक्राकार वारे आणि कमी दाबाच्या पट्ट्याची निर्मिती होत असल्यामुळं तापमानात हे बदल दिसून येत असल्याचं सांगण्यात येत आहे.

मार्च महिन्यात पावसानं हजेरी लावल्यामुळं उत्तर भारतातील बहुतांश भागांमध्ये तापमानात घट झाल्याचं पाहायला मिळेल. तर, दोन पश्चिमी झंझावातांमुळं पावसाचं हे सत्र इतक्यात काढता पाय घेणार नाही अशीच चिन्हं आहेत. उत्तर पश्चिम भारताला प्रामुख्यानं पावसाचा तडाखा बसेल ज्यामध्ये दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरचा समावेश आहे. तर पूर्व भारतातील बिहार, झारखंड, बंगाल आणि सिक्कीमसह ओडिशामध्ये वादळी पावसाचा इशारा आहे.

पुढील 48 तासांमध्ये पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये गारपिटीचासुद्धा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### 12 राज्य वादळाच्या हिटलिस्टवर

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसारदेशात पुन्हा एकदा हवामानात बिघाड होण्याची चिन्हं असून, उत्तर प्रदेशसह बिहार, पंजाब आणि इतर 12 राज्यांमध्ये पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. यादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी 75 किमी इतका राहू शकतो ज्यामुळं वृक्ष उन्मळून पडू शकतात असा सतर्कतेचा इशाराही देण्यात आला आहे.

## डिजिटल अरेस्ट रोखण्यासाठी व्हॉट्सअॅपचा पुढाकार
### आता थेट मोबाईल होणार ब्लॉक




**■मुंबई। प्रतिनिधी,**

देशात 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आता सरकारने कंबर कसली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या एका विशेष समितीने व्हॉट्सअॅपला सुरक्षेचे नियम कडक करण्याचे निर्देश दिले आहेत. या नवीन उपक्रमांतर्गत आता केवळ ठगांचा नंबरच नाही, तर त्यांचा मोबाईल फोन (डिव्हाइस आयडी) देखील ब्लॉक केला जाईल. याचा अर्थ असा की, जर एखाद्या फोनवरून फसवणूक झाली, तर त्या उपकरणावर भविष्यात व्हॉट्सअॅप चालवणे अशक्य होईल.

एका इंग्रजी दैनिकातील वृत्तानुसार, व्हॉट्सअॅप या बदलांसाठी तयार असून त्यांनी काही स्तरांवर कामही सुरू केले आहे. नुकत्याच झालेल्या एका बैठकीत कंपनीने सरकारला आश्वासन दिले आहे की, ग्राहकांच्या सुरक्षेसाठी ते प्रत्येक आवश्यक पाऊल उचलतील.

### ठगांचे फोन होणार निकामी

या संपूर्ण रणनीतीतील सर्वात मोठे शस्त्र म्हणजे ठगांचे फोन कायमचे बंद करणे. व्हॉट्सअॅप हे डिव्हाइस कसे ब्लॉक करणार, याचा आराखडा सरकारने ४५ दिवसांच्या आत मागवला आहे. जेणेकरून गुन्हेगार एकाच फोनवरून वारंवार नवीन अकाउंट्स तयार करून लोकांना लक्ष्य करू शकणार नाहीत. याशिवाय, व्हॉट्सअॅपला आता डिलीट केलेल्या अकाउंट्सचा डेटा किमान १८० दिवसांपर्यंत जतन करून ठेवावा लागेल, जेणेकरून पोलीस तपासात पुरावे गोळा करता येतील.

### बनावट लोगो ओळखणारी यंत्रणा

अनेकदा ठग हे पोलीस, सीबीआय किंवा एटीएसचा बनावट लोगो लावून लोकांना घाबरवतात. हे रोखण्यासाठी ह्यलोगो डिटेक्शनह्न तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. सरकारी चिन्हांचा चुकीचा वापर करणारे प्रोफाइल फोटो ओळखताच ते अकाउंट त्वरित डिलीट केले जाईल.

### एआय आणि संशयास्पद कॉलवर नजर

व्हॉट्सअॅप आता स्काईपसारख्या सुरक्षा फीचर्सवर काम करत आहे. यात कॉल करणाऱ्याची अधिक माहिती आणि संशयास्पद कॉल आल्यास युजरला चेतावणी देणे यासारख्या पर्यायांचा समावेश असेल. गृह मंत्रालयाच्या समितीने धोकादायक फाइल्सद्वारे होणारी फसवणूक रोखण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या (एआय) वापरावरही भर दिला आहे. डिजिटल अरेस्टच्या प्रकरणांमध्ये ठग तासनतास व्हिडिओ कॉल करून लोकांचा मानसिक छळ करतात, त्यामुळे आता लांब आणि संशयास्पद कॉल्स ओळखण्यासाठी विशेष यंत्रणा तयार केली जात आहे.

### डिजिटल अरेस्ट प्रकरणात दोन वर्षांत तिप्पट वाढ

- 2024 मधील गुन्हेः सुमारे 1.23 लाख डिजिटल अरेस्टची प्रकरणे
- लुटलेली रक्कमः 1,935 कोटी रुपये.
- वाढः 2022 च्या तुलनेत ही संख्या तिप्पट झाली आहे.

या धोक्याकडे पाहता सरकारने व्हॉट्सअॅप, टेलिग्राम आणि सिग्नल यांसारख्या अॅप्सना 'सिम बाइंडिंग' सिस्टिम लागू करण्यास सांगितले आहे. पुढील 4 ते 6 महिन्यांत ही व्यवस्था लागू होईल. त्यानंतर, अॅप केवळ त्याच फोनमध्ये चालू शकेल ज्यामध्ये सिम कार्ड अॅक्टिव्ह असेल. कंपनी आपला संपूर्ण प्रोग्रेस रिपोर्ट मार्च अखेरपर्यंत सरकारला सादर करणार आहे.

## बाळासाहेब थोरातांच्या चुलत भावासह चौघांकडून पंचायत समितीतील अधिकाऱ्याला बेदम मारहाण

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथे एका शासकीय अधिकाऱ्याला कार्यालयात घुसून बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे चुलत भाऊ शरद नाना थोरात आणि त्यांच्या समर्थकांनी पंचायत समितीचे तालुका अभियन व्यवस्थापक नंदलाल पोपटराव कोकाटे यांना त्यांच्याच केबिनमध्ये गाठून मारहाण केली. या प्रकरणी कोकाटे यांनी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दाखल केली असून, शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आणि बेदम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी, 23.03.2026 रोजी दुपारी 02.10 वाजेच्या सुमारास घडली असून, यामुळे प्रशासकीय




वतुर्ळात खळबळ उडाली आहे. कोकाटे हे गेल्या 2 वर्षापासून संगमनेर येथे कार्यरत असून तालुक्यातील महिला बचत गटांचे नियंत्रण आणि बँक कजार्चे कामकाज पाहतात. या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आलाय.

महिलेच्या मानधनाच्या वादातून मारहाण

या वादाचे मूळ शेडगाव येथील महिला बचत गटातील समुदाय संसाधन व्यक्ती (सी.आर.पी.) शितल उगलमुगले यांच्या मानधनात दडलेले आहे. कोकाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, उगलमुगले यांच्या कामाबद्दल तक्रारी असल्याने आणि कामगिरी असमाधानकारक असल्याने गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस बजावली होती, परंतु त्यास उत्तर न मिळाल्याने त्यांचे (शितल उगलमुगले) मानधन थांबवण्यात आले होते. याच कारणावरून दुपारी 02.10 वाजता शरद नाना थोरात, शितल उगलमुगले आणि त्यांचे पती कोकाटे यांच्या कार्यालयात आले. मानधन का थांबवले, अशी विचारणा करत थोरात यांनी कोकाटे यांना मारहाण केली. त्यावेळी उपस्थित कर्मचारी नंदकुमार वडेकर आणि भाऊसाहेब शिंदे यांनी मध्यस्थी करून वाद सोडवला, मात्र हा केवळ एका मोठ्या हल्ल्याची सुरुवात होती.

### कार्यालयात घुसून सामूहिक हल्ला आणि धमकी

पहिल्या घटनेनंतर काही वेळातच, म्हणजेच दुपारी 02.30 वाजता, 7 ते 8 अनोळखी तरुण कोकाटे यांच्या कार्यालयात शिरले. त्यांनी कोकाटे यांचे नाव विचारून खात्री केली आणि त्यानंतर 4 ते 5 जणांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण करणाऱ्यांमध्ये अभिषेक थोरात, ऋषिकेश थोरात, अक्षय भालेराव आणि शिवामृत भोकरे यांचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती कोकाटे यांनी दिली आहे. ''तू शरद नानाला ओळखत नाही का, तुला काय 353 करायचा आहे तो कर, तुझ्याकडे बघून घेतो,'' अशा शब्दांत आरोपींनी कोकाटे यांना धमकावून पुन्हा लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कार्यालयातील ओ.एस. राजेंद्र थिटमे आणि इतर कर्मचाऱ्यांनी धावून येत कोकाटे यांची आरोपींच्या तावडीतून सुटका केली. या जीवघेण्या हल्ल्यानंतर कोकाटे यांनी आपले वरिष्ठ ओ.एस. राजेश थिटमे यांना घटनेची सविस्तर माहिती दिली. कार्यालयातच अशा प्रकारे मारहाण झाल्यामुळे कोकाटे प्रचंड मानसिक धक्क्यात होते आणि भीतीपोटी त्यांनी काही वेळ पंचायत समितीपासून लांब थांबणे पसंत केले. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाणे गाठून आपली फिर्याद नोंदवली. फियार्दीत त्यांनी नमूद केले आहे की, शरद नाना थोरात यांच्या सांगण्यावरूनच या तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला असून शासकीय कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला आहे. संगमनेर पोलिसांनी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन कायदेशीर कारवाई सुरू केली असून, शासकीय कार्यालयात सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## 'नवरी' नटली, अन् लग्नाच्या दोनच दिवसांत सटकली...
## कोपरगाव पोलिसांनी आंतरजिल्हा टोळीच्या मुसक्या आवळल्या



पोलिसांनी आरोपींकडून फसवणूक करून मिळवलेली २,२९,००० रुपयांची रोख रक्कम आणि सोन्या-चांदीचे दागिने पैकी काही मुद्देमाल जप्त केले आहेत. या टोळीने अशाच प्रकारे इतरही अनेक तरुणांना गंडा घातल्याची चर्चा परिसरात असून, तपासात मोठी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

लग्न जमवताना घाई करताय? मग अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील या घटनेने तुमचे डोळे उघडतील. लग्नाचं अमिष दाखवून तरुणांना जाळ्यात ओढणाऱ्या आणि ऐन हनिमूनच्या काळात दागिने-रोख रक्कम घेऊन पसार होणाऱ्या एका हायप्रोफाईल टोळीचा कोपरगाव तालुका पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या प्रकरणी एका महिलेसह दोन तरुणींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून लुटलेला ऐवजही हस्तगत केला आहे. इतर तिघे जण फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहे. नवरी नटली आणि दोनच दिवसात सटकली अशी चर्चा कोपरगावात सध्या रंगत आहे.

कोपरगाव तालुक्यातील रवंदा येथील एका तरुणाला नाशिकमधील काही मध्यस्थांनी लग्नाचे आमिष दाखवले. २१ सप्टेंबर २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या काळात लग्नाची बोलणी झाली. मुलानेही आनंदाने लग्नासाठी होकार दिला. मात्र, हे लग्न म्हणजे आनंदाची सुरुवात नसून फसवणुकीचा सापळा होता, याची पुसटशी कल्पनाही बिचाऱ्या नवरदेवाला नव्हती.

**हनिमूनच्या आधीच 'गेम' झाला!**

लग्न पार पडल्यानंतर अवघ्या दोनच दिवसात नवी नवरी घरातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन पसार झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नवरदेवाने तातडीने कोपरगाव तालुका पोलीस ठाणे गाठले. या प्रकरणी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने नाशिकच्या आडगाव नाका परिसरातून आरोपींचा शोध घेतला. पोलिसांनी शिताफीने जाळे लावून, कशीष सुकदेव भालेराव, नम्रता सुकदेव भालेराव, भूमी किरण निकम या तिघींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या कसून चौकशीत त्यांनी संगनमताने हे खोटे लग्न लावल्याची कबुली दिली.

**पोलिसांचे आवाहन**

"लग्न जमवताना समोरच्या व्यक्तीची आणि कुटुंबाची सखोल चौकशी करा. मध्यस्थांवर आंधळा विश्वास ठेवू नका. अशी फसवणूक झाली असल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधा, असे आवाहन कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी केले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप कोळी आणि त्यांच्या पथकाने (कारखेले, रहाणे, वलवे, गवारे, वाघ, दरेकर, धनाड, वेताळ) ही धडाकेबाज कारवाई केली आहे.

## भटक्या कुत्र्याचं नख लागलं, इंजेक्शनच्या भीतीने उपचार टाळले
### 9 वर्षीय मुलीचा सहा महिन्यांनी रेबीजने मृत्यू

कशिश सहानी ही मुलगी नालासोपारा परिसरातील 'मदर मेरी' या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत होती. नालासोपारा पश्चिमेतील सुबोध सागर इमारतीत आपल्या आई-वडील कुटुंबासमवेत ती राहत होती. सहा महिन्यांपूर्वी ती आपल्या आजोबांबरोबर जात असताना तिला भटक्या कुत्र्याने नख मारले होते. तिला दुसऱ्या दिवशी उपचारासाठी नेण्यात आलं होत. मात्र इंजेक्शनच्या भीतीने ती घाबरल्याने तिला उपचार न करता घरी आणण्यात आलं होतं.



**■नालासोपारा। प्रतिनिधी,**

उनाड कुत्र्यांचा धोका सगळीकडेच वाढला आहे, यामुळे यापूर्वी काहींचे जीव गेले आहेत तर अनेकांना रेबीज सारख्या भयानक रोगाचे संसर्ग झाल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. मुंबईजवळच्या नालासोपाऱ्यात 9 वर्षीय मुलीला भटक्या कुत्र्याचे नख लागल्याने रेबीज रोगाची लागण झाली, यातच तिचा दुदैर्वाने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कशिश सहानी असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. नालासोपारा पश्चिम परिसरात ही घटना घडली आहे.

त्यानंतर काही दिवसांनी ही जखम भरल्याने हा प्रकार फारसा कोणाच्या लक्षात आला नाही. मात्र चार-पाच दिवसांपूर्वी तिची प्रकृती बिघडली तिने अन्न पाणीच बंद केल. तसेच तिचे डोळे लाल झाल्याची लक्षणे दिसली. कुटुंबीयांकडून तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचार करतात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांच्या सल्ल्याने तिला पुढे मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात तातडीने हलवण्यात आलं. मात्र याच दरम्यान तिचा उपचारादरम्यान सोमवारी मृत्यू झाला. मृत्यू अहवालात रेबीजच्या संसगार्मुळे या मुलीचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आल्याची माहिती सुबोध सोसायटीच्या सचिव श्रुती शेनॉय यांनी दिली. या सगळ्या धक्कादायक प्रकारामुळे खळबळ उडाली असून भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

नालासोपारा महानगरपालिका क्षेत्रातील तातडीने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी आता सर्व स्तरातून होऊ लागली आहे. भटक्या कुत्र्याच्या चावल्याने अथवा नख मारल्याने एका लहान मुलीचा जीव गेला आहे या घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. महानगरपालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

## मिरारोडमध्ये चोरीची तक्रार करणारीच निघाली आरोपी

**■भाईंदर। प्रतिनिधी,**


मिरारोड येथे स्वतः काम करत असलेल्या कंपनीत चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी झाल्याचा खोटा बनाव रचणाया एका महिलेसह तिच्या दोन साथीदारांना नयानगर पोलिसांनी १२ तासांच्या आत अटक केली आहे. पोलिसांनी या गुन्ह्यातील चोरीला गेलेली २ लाख ९४ हजार रुपयांची रोख रक्कम हस्तगत केली आहे. मिरारोड रेल्वे स्थानकाबाहेर असलेल्या शांती शॉपिंग सेंटरमधील एलफायव्ह टेक इंटरनॅशनल कंपनीत कामाला असलेल्या उजमा खान (वय २६) हिने १९ मार्च रोजी पोलिसांत तक्रार दिली होती. १८ मार्चच्या सायंकाळी ५:३० च्या सुमारास दोन अनोळखी इसमांनी ऑफिसमध्ये घुसून, शटर ओढून आपल्याला चाकूचा धाक दाखवला आणि टेबलाच्या ड्राव्हरमधील २ लाख ९४ हजार रुपये लुटून नेली असल्याचे तक्रारीत म्हणत गुन्हा दाखल केला होता. नयानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर जगदाळे आणि गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासादरम्यान पोलिसांना संशय आला. एका आरोपीने ऑरेंज टी-शर्ट आणि काळी टोपी घातली होती, त्याचा मागोवा घेत पथकाने अवघ्या १२ तासांत माझगाव, मुंबई येथून मुजम्मिल अब्दुल हफिज सिद्दीकी (वय २०) याला ताब्यात घेतले.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भारताचे समभाव धोरण!



पश्चिम आशियामधील युद्धामुळे भारताचा व्यापार, वाहतूक आणि ऊर्जापुरवठा यांवर परिणाम झालेला आहे. देशातील काही समाजविघातक शक्तींनी गॅस सिलिंडरांचा कृत्रिम फुगवटा निर्माण केल्यामुळे प्रतिदिन त्याच्या तुटवड्याच्या गंभीर परिणामांना सामोरे जावे लागून कोरोना महामारीसारखी स्थिती उद्भवत आहे कि काय? असे सर्वांना वाटत आहे. या पार्श्वभूमीवर भारत करत असलेले प्रयत्न ही तितकेच महत्त्वाचे आहेत. ही भारतासाठी आव्हानात्मक स्थिती असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेतून २३ मार्च या दिवशी देशाला संबोधित केले. एकीकडे शहरांतील उपाहारगृहे बंद पडत असतांना, त्यांचे कामगार गावाला परतत असतांना, काही रिक्शा इंधन पुरवठ्याअभावी रस्त्यावर थांबलेल्या असतांना दुसरीकडे युद्धजन्य देशातून ४ नौका भारतात आणणे, अमेरिकेतून गॅसपुरवठा होणे, काळा बाजार थांबवण्याचे प्रयत्न होणे, गॅस सिलिंडरांच्या पुरवठ्याच्या संदर्भात काही नियम करणे या सर्या गोष्टीही चालू ठेवत भारतीय प्रशासनाने तत्परतेने उपाययोजनाही केल्या आहेत. पंतप्रधानांचे भाषण केवळ काय उपाययोजना केल्या ? हे सांगण्यासाठी नव्हते, तर आपत्काळात देशाने, पयार्याने देशवासियांनी कसे वागले पाहिजे ? हेही त्यांनी सांगितले. 'संकटकाळात एकजुटीने आणि धोरणात्मक पद्धतीने काम करणे आवश्यक आहे', असे त्यांनी सांगितले. पंतप्रधानांच्या भाषणाला नेहमीच तात्त्विक मूल्यांचा ठोस वैचारिक आधार असतो; परंतु आता जनतेच्या दृष्टीने ही मूल्ये केवळ ऐकण्याचा भाग नसून तिने ती कृतीत आणली, तर ती आपत्काळात तरून जाणार आहे, हेही तितकेच खरे! 'टी.व्ही ९' या दूरचित्रवाणी वाहिनीच्या 'व्हॉट इंडिया थिंक्स टुडे समिट – २०२६' (भारत आज काय विचार करतो, याची बैठक – २०२६) या कार्यक्रमात २३ मार्च या दिवशी पंतप्रधान मोदी यांना पाचारण करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या आरंभी मोदी यांच्या कार्यकर्तृत्वाची वैशिष्ट्ये सांगतांना वक्त्याने 'समभाव' या महाभारतातील नीतीचा उल्लेख करत हे सध्याच्या भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचे एक वैशिष्ट्य असल्याचे सांगितले. कुणाच्या दबावाखाली न रहाता सर्व देशांप्रती ठेवलेला सम्यक भाव, हाच भारताचा कणखरपणा असून तो नेतृत्व निर्माण करत पुढे जात आहे. सध्या जगातील सर्व मोठ्या शक्तीशाली देशांपासून विकसनशील देशांसह इस्लामी देशांशी भारताने द्विपक्षीय धोरणे अवलंबून अत्यंत चांगले संबंध प्रस्थापित केले आहेत. त्याचा लाभ सध्याच्या युद्धजन्य स्थितीत भारत अनुभवत आहे. असे संबंध ठेवण्याची धमक आज भारतात निर्माण झाली आहे, हा नव्या भारतातील पालट आहे. हाच कणखरपणा लहरी ट्रम्प यांच्या अमेरिकेशी झालेला व्यापार करार स्थगित करण्याची क्षमता राखतो आणि हाच कणखरपणा त्याच वेळी अमेरिकेतून गॅसपुरवठा चालू ठेवण्याचेही दायित्व उचलतो. अर्थात सध्या मोठ्या देशांनी ट्रम्प यांना एकटे पाडल्यामुळे भारतालाही असे वागणे शक्य झाले; मात्र भारताने त्याचा अंदाज घेऊन ही भूमिका घेतली, हे महत्त्वाचे आहे. संवाद ठेवणे आणि मुत्सद्देगिरी यांमुळेच भारताला हे शक्य होत आहे. स्वतःच्या अत्यंत बिकट काळातही इराणसारख्या देशाने भारतासाठी तेलवाहू नौका हॉर्मुझ सामुद्रधुनीतून जाऊ देणे आणि भारताने त्याला औषधपुरवठा करणे यांतून हे लक्षात येते. 'आज जगभर युद्ध चालू असतांना तुलनेत भारतात चांगले आणि स्थिर वातावरण आहे; एवढेच नव्हे, तर भारतात अनेक विकासाची कामे अतीवेगाने चालू आहेत', असे मोदी यांनी या वेळी सांगितले. युद्धाने निर्माण झालेल्या 'गॅस संकटा'मध्ये भारत न डगमगता स्थिर राहून, वेळोवेळी धोरणे पालटून आणि उपाययोजना काढून त्याला तोंड देत आहे. वर म्हटल्याप्रमाणे त्या त्या वेळेनुसार त्या त्या देशाशी भारताने संबंध ठेवण्याचे स्वतंत्र धोरण ठेवण्याची नीती अवलंबल्यामुळे आता निदान हे शक्य होणार आहे. म्हणूनच अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या दिवसागणिक पालटर्णाया भूमिकेला त्या त्या प्रमाणे प्रत्युत्तर द्यायला भारत आता सज्ज आहे. एवढेच नव्हे, तर अमेरिकेने काही सल्ला किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला न जुमानता तो त्याचे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहे, हे ठामपणे सांगण्याचे सामर्थ्यही आता भारताजवळ आहे. काँग्रेसच्या काळात अणूकरार असेल किंवा पाकसंबंधीचे धोरण असेल, अमेरिकेने कित्येक काळ भारताला दबावाखाली ठेवल्याचे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे कणखरता निर्माण करणे, हे सध्याच्या शासनाच्या धोरणांचे फलित आहे. राष्ट्रसंत समर्थ रामदासस्वामींनी 'अखंड सावधान' रहाण्यास सांगितले आहे, ते अध्यात्माचा प्रवास आणि राष्ट्रसुरक्षा या दोघांसाठी लागू पडते. भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर समतोल भूमिकेने साध्य केलेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत संकटे टाळण्यासाठी सावधपणा आणि संघटितपणा वाढवायला हवा. 'संकटकाळात अंतर्गत विरोधी शक्ती अपलाभ उठवतात', असे सांगून पंतप्रधान मोदी यांनी संसदेच्या सभागृहात देशाची अंतर्गत सुरक्षा यंत्रणा सक्षम ठेवल्याचे सांगितले. २० मार्चची घटना याचे बोलके उदाहरण आहे. अमेरिकी गुप्तचर संघटना 'सीआयए'चा कथित हस्तक मॅथ्यु वेंडाई या विविध देशांत गृहयुद्ध भडकवण्यात मातब्बर असलेल्या भाडोत्रीला कोलकात्यात आणि ६ युक्रेनी आतंकवाद्यांना लखनौ अन् देहली येथे पकडण्यात आले. आज जगभर युद्ध भडकले असतांना भारतात शांतता असल्याचे काही शक्तींना पहावत नाही. कुणाला वाटेल युक्रेनी येथे का आले? मॅथ्यु त्याच्या शस्त्र आस्थापनासहित युक्रेनमध्ये लढत आहे. म्यानमार सरकारला रशियाचे समर्थन आहे. भारत–म्यानमारच्या १ सहस्र ६०० कि.मी. एवढ्या लांबीच्या सामायिक सीमेचा परिणाम भारताच्या पूर्वोत्तर राज्यांवर होतो. मॅथ्यु आणि त्याचे हे साथीदार पूर्वांचलातील विद्रोही घटकांना गनिमी कावा अन् ड्रोन तंत्रज्ञान शिकवण्यासाठी म्यानमारच्या सीमेतून भारतात आले होते. 'पूर्वांचल प्रदेश ख्रिस्ती करण्याच्या कामा'त त्यांना योगदान द्यायचे होते. यावरून सामान्य नागरिकांसह सुरक्षा यंत्रणांना किती डोळ्यांत तेल घालून रहायला हवे, हे लक्षात येते. काश्मीरप्रमाणेच पूर्वांचलात विकासकामेच नव्हेत, तर त्या व्यतिरिक्त या गुप्त कारवाया करर्णायांना पाठिंबा देर्णाया किंबहुना आपल्या माणसांच्या माध्यमातूनच त्या करून घेर्णाया अमेरिकादी देशांनाही तेवढेच धाकात ठेवणे आवश्यक आहे. नव्या भारताने आर्थिक धोरणांसमवेत हा कणखरपणाही दाखवला, तर सुरक्षेच्या संदर्भातही तो खऱ्या अर्थाने बलवान होईल. सुरक्षेसाठी सजग झालेला नवा भारत येत्या काळात हे गांभीर्याने घेईल, अशी अपेक्षा! तरुणाईची आणि नैसर्गिक ऊर्जा, भौगोलिक वरदान, तसेच आर्थिक, आध्यात्मिक अन् संख्या यांचे बळ मिळालेला भारत समतोल आणि सावध धोरण अवलंबून पुढे जात राहिला, तर तो विश्वगुरु होण्याचे स्वप्न पाहू शकतो!

# सामान्य माणसाच्या घरात पोहोचू लागलेले इराण युद्धाचे परिणाम!

जागतिक तेल पुरवठ्याच्या विस्कळीत होण्याने फक्त पेट्रोल डिझेलची टंचाई निर्माण होईल अशी सगळ्यांची धारणा असते. परंतु आधुनिक जगात क्रूड तेलापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांनी आणि वस्तूंनी इतक्या प्रमाणात घुसखोरी केलेली आहे की क्रूड पुरवठा बंद म्हणजे सामान्य माणसाचं आयुष्य ठप्प अशी स्थिती आहे. काल भारतीय संसदेत पंतप्रधान मोदी यांनी याची लॉकडाऊन सोबत केलेली तुलना ही ह्या टोकाच्या क्रूड अवलंबनामुळेच आहे. याचे दूरगामी परिणाम लक्षात ठेवले आणि आपल्याला नेमक्या काय अडचणी येऊ शकतात हे बघितलं तर येणारे काही महिने आपण काळजी घेऊ शकतो.




इराणवर अमेरिकन, इस्त्रायली हल्ले सुरू होऊन आता महिना होत आला. पहिल्या ७२ तासात इराणी शिया राजवट सत्तेवरून खाली येईल आणि आपली गुलाम राजवट इराणवर येऊन आपण हा विषय मार्गी लावून मग क्युबाचा घास घ्यायला मोकळे होऊ ही ट्रम्पची योजना काही पूर्ण होताना दिसत नाही. इराणी सैन्याने पहिल्या काही दिवसात होर्मुझ स्ट्रेट बंद केल्याने जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. आता इराण सध्या काही देशांची जहाजे आणि तेल टँकर्स प्रत्येकी २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे १८ कोटी रुपये घेऊन काही देशांची जहाजे होर्मुझ स्ट्रेट मधून जाऊ देत आहे त्यात भारतीय जहाजे सुद्धा आहेत. होर्मुझच्या आत आणि बाहेर सुमारे साडे तीन हजार जहाजे, टँकर्स अडकून पडले आहेत. आजपर्यंत इराणी सैन्याला न जुमानता बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० जहाजांवर इराणी सैन्याने मिसाईल किंवा ड्रोन डागून ती जाळल्याने कुणीही या धाडसात उतरायला तयार नाही.

**१. गॅस तुटवडा :** कतरच्या रास लफ्फान गॅस टर्मिनल वर झालेल्या इराणी हल्ल्यात मोठ्या नुकसानामुळे भारताच्या ४७% गॅस पुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे. यामुळे गॅसवर आधारित सगळे उद्योग अडचणीत आहेत. कोळशाला पर्याय म्हणून, प्रदूषण विरहित आणि वापरायला सोपा म्हणून एलपीजी गॅस कित्येक उद्योगात एकमेव इंधन स्रोत म्हणून वापरला जातो. याच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याने होणारी अडचण आता समोर येऊ लागली आहे.

- रेस्टॉरंट आणि तयार अन्न उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. याचा थेट परिणाम येणाऱ्या काळात फूड होम डिलिव्हरी उद्योगावर होईल. यात लक्षावधी लोक डिलिव्हरी चेनमध्ये राहून रोजगार कमावतात ते याने बेरोजगार होतील.
- जगातील क्रमांक २ चे सिरॅमिक उत्पादन हब गुजरातच्या मोर्बी मध्ये विकसित झालेलं आहे. इथे देशातील ९०% टाईल्स उत्पादन होतं आणि यात ९ लाखाच्या आसपास माणसे काम करतात. इथे वार्षिक ५०,००० कोटींची उलाढाल होते पैकी १८,००० कोटींची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून इथल्या ५०० कारखान्यांनी काम बंद केलं आहे कारण सध्या फक्त घरगुती गॅस पुरवठा ही सरकारची प्राथमिकता आहे. याचा परिणाम काही काळानंतर रिअल इस्टेट मधील रोजगारावर होईल कारण घर, फ्लॅट बांधून झाला तरी अंतर्गत कामे टाईल्स नसल्याने खोळंबतील.
- काचेच्या बाटल्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या भट्ट्या मोठ्या प्रमाणात गॅस वापरतात. या भट्ट्या बंद करून परत चालू करण्यात मोठा वेळ जातो आणि परत सुरू करताना नुकसान होऊ शकतं. बाटल्यांचा पुरवठा खंडित किंवा विस्कळीत झाला की दारू, औषधे पॅकिंग साठी वापरल्या जाणाऱ्या बाटल्या महाग होणार किंवा अपुऱ्या पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण होणार. याला पर्याय म्हणून प्लास्टिक बाटल्यांचा पर्याय बघावा तर तो ही पेट्रोलियम पदार्थांपासून बनतो त्यामुळे त्यातही अडचण आहेच.

**२. पेट्रोकेमिकलवर आधारित औषध उद्योग :** कित्येक आधुनिक औषधे पेट्रोकमिकल पासून बनतात. त्यामुळे त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम औषध उत्पादनावर होणं स्वाभाविक आहे. अनेक औषधात जवळपास सगळे इंग्रेडिएंट पेट्रोकेमिकल मधून येतात.

- आपण रोजच्या आयुष्यात सगळ्यात जास्त वापरतो ते औषध म्हणजे पॅरासिटामॉल ते फिनॉलपासून तयार होतं. आयबुप्रोफेन हे वेदनाशामक आयसोब्युटिल्बेन्झिन आणि प्रोपियोनिक ॲसिडपासून तयार होतं. डायबेटिक पेशंट रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरतात ते मेटफॉर्मिन ८० ते ९०% पेट्रोकेमिकल आधारित असतं. याशिवाय अन्य औषधांसाठी लागणारा ९९ टक्के कच्चा माल पेट्रोकेमिकलपासून येतो. प्लास्टिक बनवणारे 'क्रॅकर्स' बंद झाले की औषधांचा कच्चा मालही उपलब्ध व्हायचा बंद होतो.
- होर्मुझ स्ट्रेट मधून औषध निर्मितीसाठी लागणारा 'नॅफ्था' जगभरात पोचतो, ती सध्या बंद आहे. नॅफ्था हा औषध उद्योगात सॉल्व्हेंट म्हणून वापरतात आणि ॲक्टिव्ह इंग्रेडियंट वेगळा करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जगाच्या २० टक्के आणि अमेरिकेच्या ४० टक्के गरजा भारत पूर्ण करतो. पण सध्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे हा उद्योग संकटात आहे. कमी पुरवठ्यामुळे सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने उद्योगांना मिळणाऱ्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची टंचाई निर्माण झाली आहे.
- भारतातील 'सीरम इन्स्टिट्यूट' सारख्या संस्था जगाला ४०–५०% लसी पुरवते, त्याही याच पेट्रोकेमिकल पदार्थांवर अवलंबून आहेत. लसीच्या बाटल्या, सिरिंज, पॅकेजिंग मधील अत्यंत उच्च दर्जाचं विशेष ग्रेडचं प्लास्टिक आणि लसीमधील घटकही पेट्रोकेमिकलवर आधारित आहेत. त्यामुळे याच्या उत्पादन खर्चात वाढ आणि उपलब्धतेत घट होऊ घातली आहे.

**३. खते आणि कृषी उत्पादन :** जागतिक रासायनिक खतांच्या उत्पादनात अरब देश आणि इराणचा वाटा २०% आहे पण युरिया उत्पादनात हा वाटा ४६% आहे. भारत, ब्राझील, चीन हे अरब देशांचे मोठे ग्राहक आहेत. भारत आपल्या वार्षिक गरजेच्या ५०% युरिया अरब देशातून घेतो. शिवाय अमोनियम नायट्रेट सारखी अन्य खते अरब देशातून येतात. आज रशियाने खतांच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केल्याने भारतासाठी आगामी काळात वाढलेल्या दराने खते विकत घ्यावी लागतील. शिवाय कमी खतांमुळे देशातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे जगभरात अन्नाच्या टंचाईची शक्यता आत्ताच बोलून दाखवली जात आहे. अन्न टंचाई आणि राजकीय स्थिरता याचा जवळचा संबंध आहे. ज्या ज्या देशात अन्न टंचाई निर्माण होते आणि महागाई वाढते त्या त्या देशात सत्ताधारी पक्षांना आंदोलने आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो असा इतिहास आहे यामुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेत याने बरीच राजकीय वादळे येऊ घातली आहेत.

**४. सल्फर टंचाई :** अरब देशांचा सल्फर उत्पादनात ५०% जागतिक वाटा आहे. जवळपास सर्व रिफायनरी इराणी हल्ल्यांनी प्रभावित झालेल्या आहेत किंवा होर्मुझ स्ट्रेट बंद असल्याने तयार उत्पादन जागतिक बाजारात जायला रस्ता उपलब्ध नाही. याचा परिणाम सल्फर आधारित खतांच्या पुरवठ्यावर झाला आहे, शिवाय याचे दर ५०% नी वाढले आहेत. सेमीकंडक्टर उद्योगात अत्यंत शुद्ध सल्फ्युरिक ॲसिड सिलिकॉन वेफर्सच्या उत्पादन प्रक्रियेत वापरलं जातं. त्याच्या टंचाईने ही प्रक्रिया धीमी पडत आहे. शिवाय इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी उद्योगात कॉपर, निकेल, कोबाल्ट उत्पादनात सल्फ्युरिक ॲसिड अत्यावश्यक असल्याने सर्व ईव्ही उत्पादक कंपन्या सध्या चिंतेत आहेत. याचा परिणाम सरसकट सगळ्या बॅटरी उद्योगावर होणार आहे.

**५. हेलियम शॉक आणि डिजिटल उद्योग :** नैसर्गिक वायू प्रक्रियेदरम्यान उप–उत्पादन म्हणून हेलियम काढला जातो. जेव्हा एलएनजी उत्पादन थांबते, तेव्हा हेलियमचा पुरवठा बंद होतो. कतारमधील रास लाफान कॉम्प्लेक्सवर झालेल्या हल्ल्यांनंतर हेलियम उत्पादन ठप्पा आहे. इथे जगातील सर्वात जास्त हेलियम उत्पादन होतं. जागतिक पुरवठ्यापैकी सुमारे ३० ते ३६ टक्के भाग इथून पुरवला जातो. रास लफ्फान उत्पादन क्षमता कमी होणे अधिक लॉजिस्टिकच्या अडचणींमुळे हे संकट अधिक गंभीर झालं आहे. हॉर्मुझची स्ट्रेट पाश्चात्य जहाजांसाठी बंद झाल्यामुळे, हेलियमचे कंटेनर्स आखाती देशांत अडकून पडले आहेत. द्रव हेलियम क्रायोजेनिक स्टोरेजमध्ये असूनही सतत बाष्पीभूत होत असतो. जर हे कंटेनर अंदाजे ४५ दिवसांच्या आत हलवले गेले नाहीत, तर गॅस टँकर्स मधील मोठा भाग कायमचा नष्ट होतो. याचा परिणाम बाजारात आधीच दिसत असून, अति–शुद्ध हेलियमच्या किमती दोन आठवड्यांत दुप्पट झाल्या आहेत.

- वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्वाची एमआरआय स्कॅनिंग मशिन्स मधून निर्माण होणाऱ्या इमेज मध्ये स्पष्टता येण्यासाठी त्या मशीनमध्ये मॅग्नेट सतत गार रहावी लागतात. त्यासाठी अत्यंत कमी तापमान राहणं अतिशय आवश्यक असतं, ही फक्त हेलियम मुळे साध्य होतं. त्यामुळे हेलियम तुटवड्याचा यावर लगेच परिणाम होणार आहे.
- तात्काळ आणि गंभीर परिणाम पूर्व आशियातील सेमीकंडक्टर उद्योगावर होत आहे. सेमीकंडक्टर बनवण्याच्या प्रक्रियेत हेलियम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. सेमीकंडक्टर मधील वेफर्स थंड करण्यासाठी याचा वापर होतो. शिवाय व्हॅक्यूम सिस्टममध्ये गळती तपासण्यासाठी हे हेलियमला अन्य पर्याय उपलब्ध नाही. ५ नॅनोमीटरपेक्षा कमी असलेल्या चिप्समध्ये निर्माण प्रक्रियेत थोडी जरी उष्णता निर्माण झाली तरी उत्पादनात मोठी घट होऊ शकते किंवा उत्पादन पूर्णपणे थांबू शकते. दक्षिण कोरिया मधील चिप उद्योग यामुळे सध्या यामुळे याच संकटात आहे. कारण कोरिया आपल्या गरजेच्या दोन–तृतीयांश हेलियम कतारमधून आयात करतो. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आणि एसके हायनिक्स सारख्या कंपन्यांनी, ज्या एआय एक्सिलेटरसाठी आवश्यक असलेल्या हाय–बँडविड्थ मेमरी पुरवठ्यात जगात आघाडीवर आहेत, त्यांनी आधीच हेलियम वाचवण्यासाठी पावले उचलायची सुरुवात केली आहे. २०२६ मध्ये यामुळे डिजिटल उपकरणे, विशेषतः मोबाईल हँडसेट, लॅपटॉप, टॅब्लेट सह सैनिकी आणि नागरी उपयोगाची ड्रोन यांच्यासह सध्या बोलबाला असलेलं एआय तंत्रज्ञान यांना कमी उत्पादन आणि वाढलेला खर्च अशा दुहेरी संकटांचा सामना करावा लागेल.

**६. अल्युमिनियम टंचाई आणि बियर, सॉफ्ट ड्रिंक, मेडिकल उपकरणे आणि पॅकिंग उद्योग :** बहरीन अल्युमिनियम कंपनी अल्बा ही जगातली एक प्रमुख अल्युमिनियम कंपनी आहे आणि जगातली सर्वात मोठी सिंगल साईट स्मेल्टिंग फॅसिलिटी म्हणून ओळखली जाते. इराणी हल्ल्याने या कंपनीने आपली तीन युनिट बंद केल्याने जागतिक पुरवठ्यात व्यत्यय आला त्यामुळे बियर आणि सॉफ्ट ड्रिंक कॅनचे दर वाढत आहेत. या पेयांना लागणाऱ्या काचेच्या बाटल्या सुद्धा गॅसच्या कमतरतेमुळे महाग झाल्या आहेत. याचा परिणाम ह्या पेयांची पॅकेजिंग २० ते ४०% महाग होण्यात होणार आहे. शिवाय औषध उद्योगात असलेली सर्जिकल उपकरणे, फॉइल्स आणि अन्नपदार्थ पॅकेजिंग मधील अल्युमिनियम वापराचे दरही महागणार आहेत. याचा एकाच वेळी अनेक उद्योगांवर परिणाम होणार आहे.

पेट्रोल, डिझेलची टंचाई आणि वाढलेले उद्योग हे दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीच्या किमतीवर परिणाम करणार आहेत. अजून भारतात म्हणावे तसे दर वाढलेले नाहीत पण लवकरच ते वाढतील. जेट फ्युएल दर वाढणार आहेतच त्यामुळे विमान प्रवास महाग होईल. अन्नधान्य, भाजीपाला, दूध, शिक्षण, रोजगार यात इंधन दरवाढ मोठा परिणाम करणार आहे. प्लास्टिक टंचाई आणि महाग प्लॅस्टिक मुळे पॅकेजिंग महाग होईल याने ईकॉमर्स कंपन्या, तयार अन्नाची होम डिलिव्हरी यांना दणका बसेल. गृहउद्योग, लघु उद्योग यात सर्वाधिक फटका खातील. भारताच्या कानाकोपऱ्यात फोफावलेला घरगुती पर्यटन उद्योग, बांधकाम उद्योग हा सुद्धा मोठ्या संकटात जाईल. यामुळे सामूहिक शहाणपणा आणि खबरदारी याची गरज निर्माण झालेली आहे. सरकारने कोरोना समस्येची आठवण करून देण्याच्या मागे हेच मोठं कारण आहे कारण लांबलेलं युद्ध आपल्याला कदाचित कोरोना विसरायला लावेल इतका काळ आणि त्यापेक्षा मोठ्या अडचणी निर्माण करू शकते!

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर अमेरिकेत बंदी?

मार्च २०२६ मध्ये अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने (यूएससीआयआरएफ) आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल ४ मार्च रोजी प्रसिद्ध झाला आणि त्यात भारताला सलग सातव्या वर्षी 'कंट्री ऑफ पर्टिक्युलर कन्सर्न' (सीपीसी) म्हणून शिफारस करण्यात आली. याच अहवालात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि रिसर्च अँड ॲनालिसिस विंग (रॉ) यांच्यावर लक्ष्यित निर्बंध लादण्याची स्पष्ट सूचना आहे. सोशल मीडियावर आणि काही माध्यमांतून ही बातमी 'अमेरिकेत आरएसएसवर पूर्ण बंदी' अशा प्रकारे पसरली त्यामुळे लोकांच्या मनात प्रश्न उभे राहिले आहेत. खरंच आरएसएसला अमेरिकेत बंदी घातली गेली का? की ही फक्त एक शिफारस आहे? ती कितपत अंमलात येईल?

यूएससीआयआरएफ हा अमेरिकेच्या काँग्रेसने स्थापन केलेला स्वतंत्र आयोग आहे. तो धार्मिक स्वातंत्र्याच्या स्थितीचे मूल्यमापन करतो आणि सरकारला शिफारसी देतो. पण या शिफारसी बंधनकारक नसतात. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्या मान्य करायच्या की नाही, हे त्यांच्यावर अवलंबून असते.

अहवालात भारतातील धार्मिक स्वातंत्र्याच्या स्थितीवर गंभीर टीका आहे. २०२५ मध्ये नवे कायदे आणि त्यांची अंमलबजावणी अल्पसंख्याकांना लक्ष्य करत असल्याचा दावा केला आहे. नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए), राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी), वक्फ सुधारणा विधेयक, धर्मांतरविरोधी कायदे, गोहत्या बंदी यांसारख्या कायद्यांना 'भेदभावपूर्ण' म्हटले आहे. हिंदू राष्ट्रवादी जमावांची हिंसा, मॉब लिंचिंग, जबरदस्तीने



भारत हा १.४ अब्ज लोकांचा विविध धर्मांचा देश आहे. हा समतोल राखणे आपली जबाबदारी आहे. धार्मिक हिंसा आणि भेदभाव कमी झाला तरच जगासमोर आपली प्रतिमा मजबूत होईल.

अटक, अपराध्यांना शिक्षा न मिळणे अशा घटनांचा उल्लेख आहे. ओदिशा, आसाम, महाराष्ट्र, काश्मीर येथील विशिष्ट घटनांचाही दाखला दिला आहे. हे सगळे वाचून वाटते की, जग भारतातील धार्मिक समतोलाबाबत चिंतित आहे.

आरएसएस आणि रॉवर लक्ष्यित निर्बंधांची शिफारस ही अहवालातील सर्वात चर्चिलेले मुद्दे आहेत. ग्लोबल मॅग्निटस्की कायद्याखाली विशिष्ट व्यक्ती किंवा संस्थांच्या अमेरिकेतील मालमत्ता गोठवणे आणि व्हिसा बंदी असे हे निर्बंध असतील. पण याचा अर्थ आरएसएसला 'दहशतवादी संघटना' घोषित करणे किंवा अमेरिकेतील हिंदू स्वयंसेवक संघ (एचएसएस) च्या सर्व शाखा बंद करणे असा नाही. ही फक्त शिफारस आहे. अंतिम निर्णय स्टेट डिपार्टमेंट घेईल आणि २०२६ पर्यंत कोणताही निर्बंध लागू झालेला नाही.

भारत सरकारने या अहवालाला तीव्र विरोध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, हा अहवाल हेतूपूर्ण, पक्षपाती आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित आहे. भारताचे बहुधर्मीय समाजाचे चित्र विकृत केले जात आहे. पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून हे अहवाल तयार होतात, असा आरोप आहे. अमेरिका–भारत संबंध 'क्वाड' जे चीनविरोधी धोरण, व्यापार आणि सुरक्षा सहकार्यावर आधारित आहेत. ट्रम्प प्रशासनासारख्या सरकारसाठी धार्मिक स्वातंत्र्याच्या मुद्द्यापेक्षा रणनीतिक भागीदारी महत्त्वाची आहे. फेब्रुवारी २०२६ मधील ट्रम्प–मोदी भेटीतही हे मुद्दे टाळले गेले.

क्वाड म्हणजे चतुर्भुज सुरक्षा संवाद. हा एक अनौपचारिक, पण महत्त्वपूर्ण गट ज्यात अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत हे चार लोकशाही देश एकत्र येतात. २००४ च्या त्सुनामीनंतर सुरू झालेला हा गट २०१७ मध्ये पुन्हा जिवंत झाला आणि आज तो चीनच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करण्यासाठी एक प्रमुख प्लॅटफॉर्म बनला आहे. भारताचे क्वाडमधील स्थान खूप खास आणि केंद्रीय आहे. भारत हा एकमेव सदस्य आहे जो थेट चीनशी भूमी सीमेवरून वादात आहे. भारतीय महासागरात भारताची भौगोलिक स्थिती, नौदलाची क्षमता आणि क्षेत्रातील प्रभाव यामुळे क्वाडसाठी भारत हा ह्यनो इंडिया, नो क्वाडह्य अशा स्थितीत आहे. क्वाडचे बहुतेक सदस्य (अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया) आधीपासूनच अमेरिकेच्या सैन्य करारात आहेत, पण भारत 'स्ट्रॅटेजिक ऑटॉनॉमी' (रणनीतिक स्वायत्तता) च्या धोरणामुळे कधीही पूर्ण सैन्य करार किंवा 'एशियन नाटो'सारखे काही स्वीकारत नाही. क्वाडचे मुख्य क्षेत्र समुद्री सुरक्षा, पुरवठा साखळी मजबूत करणे, क्लायमेट चेंज, क्रिटिकल टेक्नॉलॉजी, ह्युमॅनिटेरियन असिस्टन्स आणि डिसास्टर रिलीफ यात भारत अनेकदा नेतृत्वात असतो. २०२५–२०२६ मध्ये भारताने क्वाड स्टिम स्कॉलरशिप्स आणि अंडरसी केबल फोरमसारखे नवीन उपक्रम आणले. २०२६ पर्यंतची स्थिती पाहता, क्वाडमध्ये भारताची भूमिका आणखी मजबूत झाली आहे. २०२५ मध्ये अमेरिका–भारत संबंधात ट्रेड टॅरिफ आणि इतर मुद्द्यांवर तणाव आला होता. ज्यामुळे क्वाड लीडर्स समिट जो भारतात होणार होता थोडा उशिरा झाला किंवा बदलला. पण फेब्रुवारी २०२६ मध्ये ट्रेड डील झाल्यानंतर संबंध सुधारले आणि क्वाडची गती पुन्हा वाढली. ऑस्ट्रेलियन पंतप्रधान आणि जपानी परराष्ट्र मंत्री यांनी भारताशी चर्चा करून क्वाडची महत्ता अधोरेखित केली. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत भारतात क्वाड लीडर्स समिट होण्याची शक्यता आहे. ती जी–७ सारखी महत्त्वाची मानली जात आहे. भारत क्वाडच्या माध्यमातून इंडियन ओशनमध्ये आपली लीडरशिप मजबूत करतो, दक्षिण आशियाई आणि इंडो–पॅसिफिक देशांना सपोर्ट करतो आणि चीनच्या बीआरआयसारख्या उपक्रमांना पयार्यी विश्वसनीय पर्याय देतो. भारत ब्रिक्स, एससीओसारख्या गटांतही सक्रिय आहे, ज्यामुळे क्वाडमध्ये भारताची 'मल्टी–अलाइनमेंट' एकाच बाजूला पूर्णपणे न जाणे, पण रणनीतिक हितसंबंध टिकवणे हे धोरण दिसते. क्वाडच्या भविष्यात भारत हा 'ग्रोथ इंजिन' आणि 'स्टॅबिलायझर' म्हणून उभा राहतो.

आरएसएसची अमेरिकेतील स्थिती आजही सामान्य आहे. एचएसएस नावाने सांस्कृतिक आणि शैक्षणिक काम चालू आहे. काही वेळा काँग्रेसमध्ये लॉबिंगही होते. या शिफारशीमुळे फंडिंग किंवा व्हिसा अडचणी येऊ शकतात, पण पूर्ण बंदी येण्याची शक्यता कमी आहे. जगातील इतर देशांशी तुलना केली तर चीन, उत्तर कोरिया, इराण, पाकिस्तान, बर्मा यांसारख्या देशांना सीपीसी शिफारस आहे.

भारतात लोकशाही आहे, तरीही जमाव, हिंसा आणि कायद्यांचा दुरुपयोग यामुळे टीका होते. हे वादग्रस्त आहे, कारण भारत क्वाडमधील महत्त्वाचा भागीदार आहे. यात तत्काळ परिणाम दिसत नाहीत. पण दीर्घकाळात एचएसएसला अडचणी, शस्त्रास्त्र विक्रीवर दबाव, आंतरराष्ट्रीय प्रतिमेवर परिणाम असे होऊ शकतात. काही संघटना याचे स्वागत करतात, तर भारतातील काही पक्ष ह्यआरएसएस बंदीह्यची मागणी करतात.

# राम नवमीला अशी करा प्रभू श्री रामांची उपासना

राम नवमी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री राम यांना समर्पित हा सण आहे. चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला भगवान श्री राम यांचा जन्म झाला होता अशी मान्यता आहे. त्यामुळे या तिथीला रामनवमी साजरी केली जाते. रामनवमीच्या दिवशी उपवास करणे आणि श्री रामाची कथा ऐकल्याने श्री रामांचे आपल्याला आशिर्वाद प्राप्त होतात असे म्हणतात. यंदा रामनवमी कधी आहे? शुभमुहूर्त आणि या दिवशी प्रभू श्री रामांची उपासना कशी करावी? जाणून घेऊया..

- **रामनवमी तिथी :** पंचांगानुसार, यंदा चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील नवमी तिथीची सुरुवात २६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजून ४८ मिनिटांपासून होणार आहे. तर २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजून ०६ मिनिटांनी ही तिथी संपणार आहे. त्यामुळे स्मार्त परंपरेनुसार, यंदा राम नवमी ही गुरुवार, २६ मार्च रोजी साजरी केली जाईल. तर उदयतिथीचे पालन करणारे वैष्णव भक्त २७ मार्च २०२६ रोजी भगवान राम यांची जयंती साजरी करतील.
- **शुभ मुहूर्त :** नवमी तिथीला गुरुवार, २६ मार्च रोजी सकाळी ११:१३ ते दुपारी ०१:४१ पर्यंत शुभ मुहूर्त असेल. तर या दिवशी दुपारी १२:०२ ते १२:५१ पर्यंत अभिजित मुहूर्त असणार आहे. राम नवमीचा मध्यान्ह क्षण हा दुपारी १२:२७ वाजता असणार आहे. तर वैष्णव परंपरेनुसार शुक्रवार, २७ मार्च २०२६ रोजीही हा शुभ काळ पूजेसाठीदेखील वैध असेल.
- **राम नवमी पूजा विधी :** या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे. प्रभू श्रीराम यांचा जन्म बरोबर दुपारी १२:०० वाजता (मध्यान्ही) झाला होता, याचवेळी पूजा करावी. भगवान श्रीराम, लक्ष्मण, माता सीता, हनुमान यांचा फोटो गंगाजालाने शुद्ध करून चौरगांवर स्थापित करावा. श्री रामांची मूर्ती असल्यास पंचामृताचा अभिषेकही करू शकता. मूर्तीला तुमच्या आवडीनुसार वस्त्र घालावे, फोटोला चंदनाचा टिळा लावावा, हार, फुलं अर्पण करावे. यानंतर श्री राम नवमीची षोडपोचार पूजा करावी. पूजा करताना तुपाचा दिवा लावून राम नामाचा मंत्र जप करावा. रामरक्षा स्तोत्राचे पठण करणे किंवा रामचरितमानसातील ओळींचे पठण करणे शुभ मानले जाते. शेवटी, नैवेद्य दाखवून आरती करावी.

**हे उपाय करा**

- रामनवमीच्या दिवशी दान करणे खूप शुभ मानले जाते. या दिवशी गरीब आणि गरजूंना अन्न, कपडे आणि पैसे दान करावे.
- रामनवमीच्या दिवशी उपवास करणे खूप शुभ मानले जाते. तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार या दिवशी उपवास करू शकता.
- जर जीवनात काही अडचणी असतील तर रामनवमीच्या दिवशी श्री रामरक्षा स्तोत्राचे पठण करणे फायदेशीर असते. यामुळे घरातील नकारात्मकता दूर होते.
- एका भांड्यात गंगाजल घेऊन 'ॐ श्री ह्रीं क्लीं रामचंद्राय श्रीं नमः' या राम रक्षा मंत्राचा १०८ वेळा जप करावा आणि ते पाणी घराच्या सर्व कोपऱ्यात शिंपडावे.



## रामनवमी दिवशी अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाचा सूर्य तिलक सोहळा

# सूर्यकिरणांचा कपाळावर अभिषेक

यावर्षी रामनवमीला, राम मंदिरात विराजमान असलेल्या रामलल्लाचा सूर्य तिलक सोहळा पार पडणार आहे. हा सोहळा सुरळीतपणे पार पडावा यासाठी, सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्स्टिट्यूटचे एक पथक 25 मार्च रोजी रामनगरीमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. या पथकातील तज्ज्ञ सूर्य तिलक सोहळ्याची पाहणी करतील.

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने पुढील दहा वर्षे रामनवमीच्या दिवशी रामलल्लाच्या कपाळावर सूर्यकिरणांचा अभिषेक करण्यासाठी सीबीआरआयसोबत करार केला आहे.

27 मार्च रोजी, रामनवमीच्या दिवशी, दुपारी 12 वाजता राम मंदिरात रामलल्लांची जयंती साजरी केली जाईल. या निमित्ताने, सूर्यकिरणे चार ते पाच मिनिटे रामलल्लांच्या कपाळाला उजळवतील.

**पहिल्या रामनवमीलाही झाला होता सूर्य तिलक-** 22 जानेवारी 2024 रोजी भव्य राम मंदिरात रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इच्छेनुसार, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने पहिल्या रामनवमीला सूर्यतिलक सोहळा पार पाडला. हा सोहळा दुसऱ्या रामनवमीलाही करण्यात आला.

आता, ट्रस्टने दरवर्षी रामनवमीला हा कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आखली आहे आणि त्यासाठी सीबीआरआय सोबत दहा वर्षांचा करार केला आहे. सूर्यतिळकाच्या वेळी, राम मंदिर भाविकांना श्रद्धा, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा एक विलक्षण संगम अनुभवायला मिळतो.

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने, मुख्य शिखरावरून सूर्याची किरणांचा जमिनीवर बसलेल्या रामलल्लाच्या कपाळावर चार ते पाच मिनिटांसाठी अभिषेक केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या निर्देशानुसार, सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्स्टिट्यूट रुरकी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅस्ट्रोफिजिक्स बंगळूरु आणि इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन येथील शास्त्रज्ञ आणि तज्ज्ञांच्या पथकाने पंतप्रधानांची इच्छा पूर्ण केली.



**कार्यक्रमाचे नाव सूर्यतिलक दिले गेले -** शास्त्रज्ञांनी विस्तृत चाचण्यांमधून, पितळी नळ्या आणि भिंगांचा वापर करून रामलल्लांच्या कपाळावर प्रकाशकिरणे निर्देशित करण्याचे तंत्र विकसित केले. या घटनेला 'सूर्य तिलक' असे नाव देण्यात आले आहे. बंगळूरु येथील ऑप्टिका इन्स्टिट्यूटने विकसित केलेले हे तंत्रज्ञान, एका परावर्तक आणि भिंगांच्या माध्यमातून 75-मिलीमीटरच्या वर्तुळाकार आकारात गर्भगृहात प्रकाशकिरणे निर्देशित करते.

ही प्रक्रिया ऑप्टो-मेकॅनिकल प्रणाली (आरसे आणि भिंग) वापरून पार पाडण्यात आली. यावर्षी 27 मार्च रोजी येणाऱ्या रामनवमीला या कार्यक्रमाची पुनरावृत्ती केली जाईल. चाचण्या घेण्यासाठी सीबीआरआयचे पथक 25 मार्चपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. डॉ. अनिल कुमार मिश्रा यांच्या म्हणण्यानुसार, पथक रामनवमीपूर्वी येथे पोहोचेल आणि चाचण्या घेईल.

## राम नवमीला करा हे विशेष उपाय

# प्रभू रामाचा मिळेल आशीर्वाद

रामनवमीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की, या दिवशी प्रभू श्री रामांचा जन्म झाला होता. मर्यादा पुरुषोत्तम राम यांना हा सण समर्पित आहे. चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला रामनवमी साजरी केली जाते. पंचांगानुसार यंदा 26 मार्च रोजी साजरी होणार आहे. असं म्हणतात की, रामनवमीला मनापासून रामाची पूजा केल्यास आणि खास उपाय केल्यास त्यांचे आशीर्वाद मिळतात.

**रामरक्षा स्तोत्र पठण :** रामनवमीच्या दिवशी सकाळी लवकर उठून राम मंदिरात जावे. मंदिरात जाऊन रामरक्षा स्तोत्राचे पठण करावे. यामुळे येणारी संकटे दूर होतील.

**हळद, कुंकू आणि चंदन :** लग्नाला उशीरा होत असेल किंवा लग्न जुळण्यास विलंब होत असल्यास रामनवमीला प्रभू श्री राम आणि सीतेला हळद, कुंकू आणि चंदन अर्पण करावेत.

**हनुमान चालिसाचे पठण :** जर तुम्ही खूप दिवसांपासून एखाद्या आजाराशी झुंज देत असाल तर यापासून सुटका होण्यासाठी हनुमान चालिसाचे पठण करावे. हे पठण तुम्ही जर हनुमान मंदिरात केलेत तर उत्तम राहील. यामुळे प्रभूंसह हनुमानाचे आशीर्वाद मिळतील.

**नारळ अर्पण करा :** जर मुलबाळ होण्यास अडचणी येत असतील तर रामनवमीला लाल कपड्यात नारळ गुंडाळून सीतेला अर्पण करावे. नारळ अर्पण करताना ओम नमः शिवाय मंत्राचा 108 वेळा जप करावा.

**दिवे पेटवावेत :** रामनवमीला सुख-समृद्धीसाठी 11 दिवे दारात लावावेत.

**धान्यांचा उपाय :** रामनवमीला श्री रामांना सात धान्ये अर्पण करावीत. यामुळे घरातील संपत्ती वाढण्यास मदत मिळते.



# रामनवमीचा दिवस पण पूजा मात्र रावणाची, महाराष्ट्रातील अनोखे गाव कुठे आहे?

रामनवमीच्या दिवशी संपूर्ण देश जेव्हा रामभक्तीत नहालेला असतो. तेव्हा महाराष्ट्रातील एका गावात चक्क रावणाची महापूजा केली जाते. हे गाव कोणते आहे? जाणून घ्या

- **महाराष्ट्रातील एकमेव गाव जिथे रावणाची पूजा केली जाते :** देशभरातच नाहीतर, परदेशातही अनेक ठिकाणी मोठ्या धामधुमीत रामनवमीचा सण साजरा केला जातो. विशेष म्हणजे अयोध्येला हा दिवस एका महोत्सवाप्रमाणे साजरा केला जातो. प्रभू श्री रामांची पूजा-अर्चा केली जाते. पण जेव्हा सगळीकडे रामनवमीचा उत्सव साजरा केला जातो, तेव्हा महाराष्ट्राच्या एका गावात चक्क रावणाची पूजा केली जाते. एवढेच काय तर या गावात रावणाचे भव्य-दिव्य मंदिर बांधण्याचीही तयारी सुरू आहे. हे कोणते अनोखे गाव आहे जाणून घेऊया.
- **रावणाची पूजा :** महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातील सांगोळा हे एकमेव गाव आहे जिथे रावणाची पूजा केली जाते. ही जवळजवळ 350 वर्षांपूर्वीपासून चालत आलेली परंपरा आहे.
- **शूरवीर आणि ब्राम्हण :** रामायणातील सीता मातेचे अपहरण करणाऱ्या दुष्ट रावणाला या गावात एक विद्वान, शूरवीर आणि ब्राम्हण म्हणून पूजले जाते.
- **रावणाला दैवत मानले जाते :** रावणाच्या वाईट वृत्ती आणि शक्तीला नाही तर, एक ज्ञानी ब्राम्हण म्हणून त्याला महत्त्व दिले जाते. रामनवमी श्री रामांच्या विजयाचे प्रतीक असली तरी, सांगोळ्यात रावणालाच दैवत मानले जाते.
- **350 वर्षे जुनी रावणमूर्ती :** या गावाच्या पूर्वेला ओट्यावर एक भव्य, काळ्या पाषाणाची दहा तोंडे आणि वीस हात असलेली 350 वर्षे जुनी रावणमूर्ती आहे. विशेष म्हणजे ही मूर्ती बसलेल्या अवस्थेत आहे.
- **रावणाची महाआरती :** दसऱ्याच्या दिवशीही संपूर्ण देश रावण दहन करत असताना, सांगोळा गावात सकाळी गावकरी एकत्र येऊन रावणाची महाआरती करतात. तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रमही पार पाडले जातात.
- **गावकऱ्यांची श्रद्धा :** येथिल गावकऱ्यांची अशी श्रद्धा आहे की, रावणामुळे गावावर कोणतेही संकट येत नाही. तसेच कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करण्यापूर्वी ग्रामस्थ रावणाचे दर्शन घेतात.
- **भव्य-दिव्य रावण मंदिर बांधण्यासाठी पुढाकार :** तसेच आता रामनवमीच्या दरम्यान, येथिल आमदारांनी भव्य-दिव्य रावण मंदिर बांधण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

## सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी पालिका आक्रमक
# महापौरांनी घेतला ठाण्यातील गॅस पुरवठ्याचा आढावा

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**


आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका हद्दीत घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते. बैठकीत नागरिकांना वेळेत गॅस मिळावा, यासाठी उपाययोजनांवर भर देण्यात आला. शहरात कुठेही गॅसचा काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे तसेच ज्या सोसायट्यांमध्ये महानगर गॅसची प्रलंबित कनेक्शन्स आहेत ती लवकर सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत ऑनलाइन बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना सिलिंडर वेळेत मिळत असल्याचे एचपी गॅसच्या नोडल अधिकारी चित्रा नायर यांनी सांगितले.

वेटिंग लिस्ट कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. मात्र, लहान व्यावसायिकांना वेळेत गॅस मिळत नसल्याचा मुद्दा चर्चेत आला. याबाबत शासनस्तरावर चर्चा सुरू असून लवकरच निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हनमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, गटनेते पवन कदम, मुकेश मोकाशी, अभिजीत पवार, सरफराज खान, जिल्हा पुरवठा अधिकारी सजेर्राव म्हस्के पाटील, पोलीस विशेष शाखेच्या मीना मकवाना, उपायुक्त मधुकर बोडके, शिधावाटप अधिकारी प्रशांत काळे, सुरेखा चव्हाण, सुभाष डुंबरे, रोहित माळकर तसेच विविध गॅस कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

**प्रलंबित जोडण्यांवर लक्ष**

प्रत्येक प्रभागातील गॅस कनेक्शनसंदभार्तील मागण्या संकलित करून संबंधित कंपन्यांकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार महानगर गॅस व इतर कंपन्यांनी प्राधान्यक्रम ठरवून कामे पूर्ण करावीत, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. दरम्यान, अनेक ठिकाणी पाईप गॅस कनेक्शन मंजूर असूनही प्रत्यक्ष पुरवठा सुरू नसल्याचे समोर आले आहे. काही भागांत ४ ते ५ वर्षांपासून गॅस पुरवठा प्रलंबित असल्याची बाबही उघडकीस आली. या प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.



**ठाण्यातील हॉटेल,उद्योगांना दिलासा**
**एलपीजी वाढीच्या आदेशाची अंमबजावणी करणार**

केंद्र सरकारने राज्यांना दिल्या जाणाऱ्या एलपीजी कोट्यात ५० टक्क्यांपर्यंत मोठी वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल, अशी माहिती ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे. यामुळे ठाण्यातील हॉटेल, उद्योगांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यांना यापूर्वी मिळणाऱ्या २० टक्के आणि त्यानंतर सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आलेल्या १० टक्के कोट्याव्यतिरिक्त आता अतिरिक्त २० टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिक एलपीजीचा एकूण पुरवठा आता संकटपूर्व काळातील पातळीच्या ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. या वाढीव कोट्याचा सर्वाधिक फायदा रेस्टॉरंट्स, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा आणि सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. तसेच स्थलांतरित मजुरांसाठी उपलब्ध असलेल्या ५ किलोच्या एफटीएल सिलिंडर पुरवठ्यालाही यात प्राधान्य देण्यात आले आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सरकारने काही अटीही लागू केल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना संबंधित तेल कंपन्यांकडे आपली अधिकृत नोंदणी करणे अनिवार्य केली आहे. या कंपन्या ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि त्यांच्या क्षेत्राचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणार आहेत. यासोबतच, ज्या भागात पाईप गॅसची सुविधा उपलब्ध आहे, तिथे ग्राहकांनी पीएनजीसाठी अर्ज करणे आणि त्या वापरासाठीची तयारी दर्शविणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे व्यावसायिक क्षेत्रातील इंधन टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे.

# रामनवमीनिमित्त ट्रॅफिक निर्बंध
## वागळे परिसरातील अनेक रस्ते बंद, पर्यायी मार्ग कोणते?




**वाहतूक बदल कसे असतील?**
- हनुमाननगर सर्कल : रामनगर सर्कलहून वागळे बस डेपोच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद
- पर्याय : रामनगर सर्कलवरून सरळ जाऊन सर्कल क्रमांक २२ येथे उजवीकडे वळावे.
- रोड क्रमांक १६ ते सर्कल २२ मार्ग : साठेनगर ते इंदिरानगर मार्ग बंद
- पर्याय : सर्कल २२ येथे यू-टर्न घेऊन रोड क्रमांक २१ वरून पुढे जावे.
- लोकमान्य बस डेपो ते इंदिरानगर : सावरकर नगर पोलीस चौकी येथे प्रवेशबंदी
- पर्याय : चौकीवरून डावीकडे वळून पयार्यी मार्ग वापरावा
- आर. जे. ठाकूर कॉलेज परिसर : यशोधन नगर ते डावले नगर तसेच महात्मा फुले नगरमार्गे कामगार नाका येथे प्रवेश बंद
- पर्याय : जवळच्या पयार्यी मार्गांद्वारे वाहतूक वळवली जाईल

■ **पुणे। प्रतिनिधी,**

राम नवमीनिमित्त मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यातील वागळे इस्टेट उपविभागातील अनेक रस्ते गुरुवार (दि.२६ मार्च) रोजी दुपारी १ ते रात्री ११ या वेळेत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. सुमारे ९ ते १० हजार नागरिक या मिरवणुकीत सहभागी होण्याची अपेक्षा असल्याने वाहतूक पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे.

**'या' मार्गांवरून मिरवणूक**

ही मिरवणूक हनुमाननगर, वागळे बस डेपो, साठेनगर आणि इंदिरानगर कामगार नाका या प्रमुख मार्गांवरून जाणार आहे. त्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विविध ठिकाणी प्रवेशबंदी आणि वाहतूक वळवण्यात येणार आहे.

**आपत्कालीन सेवांना सूट**

अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि पोलिसांची वाहने यांना या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे, असे वाहतूक विभागाने स्पष्ट केले आहे.

**प्रवाशांना सूचना**

वागळे इस्टेट परिसरात या वेळेत वाहतुकीत विलंब होण्याची शक्यता असल्याने वाहनचालकांनी पयार्यी मार्गांचा वापर करावा आणि प्रवासाचे नियोजन आधीच करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ठाणेकरांनो लक्ष द्या! कल्याण-शिळ रोडवर ३१ मार्चपर्यंत वाहतूक बंद... पर्यायी मार्ग कोणते?

**टप्प्याटप्प्याने वाहतुकीत बदल**
- ६ ते १० मार्च : या कालावधीत सोनारपाडा (पिलर क्रमांक १८०) येथे वाहतूक बंद राहील. येथून वाहनांना डावीकडे वळवून सर्व्हिस रोडमार्गे डीएनएस चौक मार्गे पुढे सोडण्यात येईल.
- ११ ते १८ मार्च : या टप्प्यात विकोनाका (पिलर क्रमांक १०५) येथे प्रवेश बंद असेल. वाहनांना विकोनाका येथून डावीकडे वळवून सर्व्हिस रोडमार्गे पिलर क्रमांक ६७ टाटा नाका मार्गे पुढे जाता येईल.
- १९ ते २५ मार्च : या काळात मानपाडा चौक (पिलर क्रमांक २००) येथे वाहतूक बंद राहील. वाहनांना डावीकडे वळवून सर्व्हिस रोडमार्गे सोनारपाडा (पिलर क्रमांक १८०) मार्गे पुढे जाता येईल.
- २६ ते ३१ मार्च : अंतिम टप्प्यात सोनारपाडा (पिलर क्रमांक १६४) येथे वाहतूक बंद ठेवली जाईल. वाहनांना सर्व्हिस रोडमार्गे वळवून डीएनएस चौकाजवळ पुन्हा मुख्य रस्त्यावर सोडण्यात येईल.

■ **वसई। प्रतिनिधी,**

कल्याण-तळोजा मेट्रो लाईन-१२ प्रकल्पाच्या कामासाठी कल्याण-शिळ मार्गावर काही ठिकाणी रात्रीच्या वेळी वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय ठाणे शहर वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. मेट्रो प्रकल्पासाठी मोठे सिमेंट गर्डर बसवण्याचे काम सुरू असल्यामुळे ही बंदी ६ मार्च ते ३१ मार्च २०२६ दरम्यान



दररोज रात्री ११.५५ ते पहाटे ५ या वेळेत लागू राहणार आहे. ठाणे वाहतूक विभागाच्या माहितीनुसार, मानपाडा सर्कल ते टाटा नाकादरम्यान मेट्रोचे गर्डर बसवण्यासाठी जड गॅन्ट्री यंत्रांचा वापर केला जाणार आहे.

या कामादरम्यान नागरिकांची आणि कामगारांची सुरक्षा लक्षात घेऊन काही ठिकाणी वाहतूक बंद करून वाहनांना पयार्यी मार्गाने वळवण्यात येणार आहे. दरम्यान, ठाणे वाहतूक पोलिसांनी रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी या नियमांचे पालन करावे तसेच शक्य असल्यास पयार्यी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन केले आहे.

# नवी मुंबईच्या मोरबे धरणात ५५% साठा... २१ ऑगस्टपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा




■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

यंदा फेब्रुवारी महिन्यापासूनच उष्णतेची तीव्रता वाढू लागल्याने त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होऊ लागला आहे. मार्चच्या पहिल्या दोन आठवड्यांत मे महिन्यासारखी कडक उन्हाची परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याचा वापरही वाढला आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या मोरबे धरणातील जलसाठा सध्या सुमारे ५५.३५ टक्क्यांवर आला असून, नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

स्वतःच्या मालकीचे धरण असणारी मुंबईनंतर नवी मुंबई ही पहिलीच महानगरपालिका आहे. मोरबे धरणातील सध्याचा साठा २१ ऑगस्टपर्यंत शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तो पुरेसा असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. मात्र, वाढती उष्णता आणि वाढता पाणीउपसा यामुळे साठ्यात हळूहळू घट होत असल्याचे दिसून येत आहे.

**मोरबे धरणातील पाणीस्थिती (१७ मार्च २०२६)**

| वर्ष | पाणीसाठा (%) |
|---|---|
| २०२३-२४ | ५२.७३% |
| २०२४-२५ | ५८.३१% |
| २०२५-२६ | ५५.३५% |

# फेसबुकवरील 'कौन बनेगा करोडपती'शी संबंधित प्रश्नमंजुषा सोडवणे महिलेला पडले महागात... लाखोंची फसवणूक

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

विलेपार्ले येथे राहणाऱ्या एका महिलेला फेसबुकवर 'कौन बनेगा करोडपती' शी संबंधित प्रश्नांची उत्तरे देणे चांगलेच महागात पडले आहे. सायबर गुन्हेगारांनी बक्षीस मिळवून देण्याचे आमिष दाखवून विविध कर आणि शुल्कांच्या नावाखाली पीडित महिलेकडून 1.12 लाखांहून अधिक रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. या घटनेप्रकरणी विले पार्ले पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हेतल प्रमोद ओझा (47) या 18 मार्चच्या रात्री 10.30 वाजता आपल्या मोबाइल फोनवर फेसबुक पाहत होत्या. याचवेळी त्यांना ह्यकौन बनेगा करोडपतीह्व नावाचे एक फेसबुक पेज दिसले, ज्यावर विविध प्रश्न विचारले जात होते. कोडी आणि प्रश्नमंजुषा सोडवण्याची आवड असल्याने त्यांनी त्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात केली. पुढील दोन दिवस त्या त्या पेजवर सक्रिय होत्या. 20 मार्चच्या सकाळी, त्यांना एका अनोळखी मोबाइल क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख केबीसी चा प्रतिनिधी म्हणून करून दिली. फोन करणाऱ्या व्यक्तीने हेतल ओझा यांना सांगितले की, तुम्ही एक पांढऱ्या रंगाची 'टाटा मोटर्स'ची कार आणि 8,50,000




रुपयांचे रोख बक्षीस जिंकले आहे. आपले दावे खरे वाटावे म्हणून फोन करणाऱ्या व्यक्तीने हेतल ओझा व्हॉट्सॲपद्वारे विविध बनावट कागदपत्रे पाठवली. ज्यामध्ये टाटा कारचा फोटो, डइउ चे नाव असलेल्या बँक चेकबुकची प्रतिमा, तसेच आधार कार्ड आणि पॅन कार्डच्या बनावट प्रतींचा समावेश होता.

फोन करणाऱ्या व्यक्तीने हेतल ओझा यांना विचारले की, तुम्हाला कार पाहिजे की रोख रक्कम. हेतल ओझा यांनी रोख बक्षीस स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर आरोपीने त्यांना एक बनावट 'केबीसी जिंकल्याचे पत्र' पाठवले, ज्यावर हेतल ओझा यांचा फोटो होता आणि बक्षिसाची रक्कम मिळवून देण्यासाठी विविध शुल्क भरण्याचे निर्देश दिले होते. सुरुवातीला आरोपीने एक दफकोड पाठवला आणि 'फाईल शुल्क' व 'नोंदणी शुल्क' च्या नावाखाली 1,550 रुपये भरण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने TDS आणि GSTच्या नावाखाली 16,600 रुपये उकळले आणि हेतल ओझा यांना आश्वासन दिले की, ही रक्कम अंतिम बक्षिसाच्या रकमेत परत जमा करून त्यांना परत केली जाईल.

फसवणूक करणाऱ्याने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नावाने एक बनावट मॅसेज पाठवला आणि 8.50 लाख रुपयांची बक्षीस रक्कम मिळवून देण्यासाठी पुन्हा 32,100 रुपये जीएसटी भरण्याची मागणी केली. विविध कारणे सांगून फसवणूक करणाराने हेतल ओझा यांच्याकडून सहा वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे मोनू कुमार आणि शिवम कुमार यांच्या नावावर असलेल्या खात्यांमध्ये एकूण 1,12,650 रुपये हस्तांतरित करण्यास भाग पाडले. संध्याकाळी जेव्हा हेतल ओझा यांचे पती घरी परतले आणि त्यांनी आपल्या पतीला हा संपूर्ण प्रकार सांगितला. तेव्हा हेतल ओझा यांच्या पतीच्या लक्षात आले की, आपण सायबर फसवणुकीचे बळी ठरलो आहोत. त्यानंतर विलेपार्ले पोलीस ठाण्यात फसवणूक प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी 'भारतीय न्याय संहिता' आणि 'माहिती तंत्रज्ञान कायदा' यांच्या संबंधित कलमांखाली एका अज्ञात मोबाइल फोन धारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.

# विवाहित महिलेच्या प्रेमात वेड्या झालेल्या तरुणाने आईची हत्या केली

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राजस्थानातील अलवर पोलीस ठाणे हद्दीत रुपबास गावात, एका विवाहित महिलेच्या प्रेमात वेड्या झालेल्या एका व्यक्तीने आपल्या वृद्ध आई आणि लहान भावावर तलवारीने हल्ला केला. आरोपीने एका महिलेच्या नादाला लागून असं भयंकर कृत्य केलं आहे, यामुळे मोठा वाद उफळला. अशातच लेकाने आपल्या आईची हत्या केली आणि लहान भावावर हल्ला करून त्याला जखमी केले.

**तरुणाने विवाहित महिलेला घरी बोलावले, नंतर आईसह कुटुंबाला हाकलून दिले**

पोलिसांनी सांगितलं की, आरोपी गगन सिंगविरुद्ध अनेक गुन्हे दाखल करण्यात आले. स्थानिकांच्या मते, तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. कुटुंबीयांनी सांगितलं की, गगनने अलीकडेच विवाहित महिलेला आपल्या घरी आणले होते, नंतर त्याने आईसह लहान भावाला आणि त्याच्या कुटुंबीयांना घरातून हाकलून दिले.

**वाद उफळला आणि कान आणि हातावर हल्ला**

पीडित कुटुंबाला गेल्या सहा महिन्यांपासून एका पत्राच्या घरात राहण्यास भाग पाडले. कुटुंबाचा आरोप आहे की, त्यांनी सदर पोलीस ठाण्यात आणि पोलीस अधीक्षकांकडे अनेकदा तक्रार दाखल केली, परंतु यामागे कोणतीही कारवाई झाली नाही. बुधवारी सकाळी वाद उफळला आणि गगन सिंगने तलवारीने हल्ला करत मोहन सिंग यांचे कान आणि हातावर हल्ला करत हत्या केली.

कुटुंबातील सदस्यांच्या म्हणण्यांनुसार, महिलेनं त्याला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला घरी घेऊन आला, तेव्हापासून कुटुंबात सततचा वाद झाला. दररोजच्या वादाने गगनने आपल्या लहान भावासह वृद्ध आईलाही घरातून हकलून दिले होते. संबंधित प्रकरणात सदस्यांचा आरोप असा की, महिला गगनला चिथावणी देते आणि कुटुंबात त्रास निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

कुटुंबातील सदस्य गगनाच्या कृत्याचा विरोध करत होते, आणि त्यानंतर ही घटना घडली होती. जखमी कुटुंबीयांच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी एफआरआय दाखल केला असून आरोपी गगनचा शोध सुरु केला. शेजाऱ्यांचीही चौकशी करून त्यांचे जबाब नोंदवण्यात आले.



# मालाडमध्ये निमार्णाधीन इमारतीच्या खड्डुयात बुडून 7 वर्षांच्या बालकाचा मृत्यू... कंत्राटदार, इंजिनिअरवर गुन्हा दाखल

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मालाड पूर्व येथील कुरार गावात एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका निमार्णाधीन इमारतीच्या परिसरात खोदलेल्या आणि पाण्याने भरलेल्या खोल खड्डुयात पडून एका सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी बांधकाम प्रकल्पाशी संबंधित कंत्राटदार आणि इंजिनिअर यांच्याविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुरार गावच्या गावदेवी मंदिराजवळ असलेल्या छगन शिवा पटेल चाळीत राहणारे राजेश लालचंद मोर्या यांचा सात वर्षांचा मुलगा दिव्यांश गुरुवारी संध्याकाळी घराबाहेर खेळत होता. राजेश मोर्या एका खासगी कंपनीत नोकरी करतात. त्यांनी पोलिसांना सांगितले की, संध्याकाळी 7 वाजेच्या सुमारास दिव्यांश घराबाहेर इतर मुलांसोबत खेळत होता, पण काही वेळाने तो अचानक दिसेनासा झाला. बराच वेळ शोध घेऊनही तो सापडला नाही.

**सुरक्षेचा अभाव पडला महागात**

तपासात असे समोर आले आहे की, बांधकाम स्थळावर सुरक्षेच्या प्राथमिक सोयीदेखील करण्यात आल्या नव्हत्या. इतका खोल आणि पाण्याने भरलेला खड्डा असूनही तिथे कोणतीही तटबंदी, सुरक्षा जाळी किंवा सावधगिरीचा बोर्ड लावण्यात आला नव्हता. इमारत बांधकाम कंत्राटदार, इंजिनिअर यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला. कुटुंबीयांच्या तक्रारीवरून आणि प्राथमिक तपासाच्या आधारे, पोलिसांनी माऊली साई डेव्हलपर्सशी संबंधित कंत्राटदार दिनेश पटेल, इंजिनिअर किशन आणि इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध निष्काळजीपणा आणि सुरक्षेचे पुरेशी व्यवस्था न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.



नातेवाईकांकडे विचारपूस करूनही काहीच माहिती न मिळाल्याने कुटुंबीयांनी तत्काळ कुरार पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अपहरणाच्या संशयावरून भारतीय न्याय संहिता कलम 137(2) अंतर्गत गुन्हा दाखल करून शोध सुरू केला.

**खड्डुयातील पाण्यात दिसले मुलाचे पाय**

या दरम्यान, मुलाचे वडील राजेश मोर्या घराशेजारीच असलेल्या माऊली साई डेव्हलपर्सच्या ह्यसी-विंगह्वच्या पाठीमागे सुरू असलेल्या बांधकाम स्थळावर पोहोचले. तिथे बांधकामासाठी एक खोल खड्डा खोदला होता, ज्यामध्ये पाऊस आणि बांधकामाचे पाणी साचले होते. जेव्हा त्यांनी खड्डुयाकडे नीट पाहिले, तेव्हा पाण्याच्या पृष्ठभागावर लहान मुलाचे पाय तरंगताना दिसले. हे पाहून त्यांना धक्काच बसला. त्यांनी तातडीने खड्डुयात उतरून मुलाला बाहेर काढले, मात्र दिव्यांश तेव्हा बेशुद्ध होता. त्याला तातडीने जवळच्या माऊली रुग्णालयात नेण्यात आले, परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्याला कांदिवलीच्या शताब्दी रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

**सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाली घटना**

अपघाताचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी पोलीस आणि नातेवाईकांनी बांधकाम स्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमध्ये दिसले की, 19 मार्च रोजी रात्री 8 वाजून 27 मिनिटांनी दिव्यांश आपला चेंडू काढण्यासाठी एका लाकडी बांबूच्या सहाय्याने खड्डुयापाशी गेला होता. चेंडू खड्डुयात पडला होता आणि तो काढण्याच्या प्रयत्नात त्याचा तोल गेला आणि तो थेट खोल पाण्यात पडला. खड्डा खोल असल्याने आणि त्यात पाणी असल्याने तो बाहेर येऊ शकला नाही.




# घटस्फोटानंतर प्रेमविवाह केल्याच्या रागातून 25 वर्षीय मुलीच्या नातेवाईकांनी तरुणाला विवस्त्र करत केलं विकृत कृत्य!

■ **जळगाव। प्रतिनिधी,**

घटस्फोटानंतर प्रेम विवाह केल्याच्या रागातून भुसावळ येथे 25 वर्ष तरुणाला बेदम मारहाण करत त्याची नग्न धिंड काढत तसेच रुमालाने गळा आवळून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चेतन दिलीप जंगले असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून त्याच्या पत्नीलाही जबरदस्ती पळून नेण्यात आल्याची माहिती आहे.. याप्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून मुलीच्या नातेवाईकांसह 5 जणांना या प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भुसावळ शहराजवळ असलेल्या खडका गावातील चेतन जंगले या तरुणाने घटस्फोटानंतर दुसऱ्या मुलीशी प्रेम विवाह केला होता. हा तरुण भुसावळ येथे त्याच्या मामाच्या घरी थांबला असताना त्या ठिकाणी मुलीच्या नातेवाईकांनी येऊन त्याला धमकवत त्याच्या पत्नीला मारहाण केली.

इतक्यावरच हा प्रकार थांबला नाही, तर पुढं तरुणाला पकडून रुमालाने गळा आवळण्याचा प्रयत्न केल्याने तरुणाने जीव वाचण्यासाठी पळण्याचा प्रयत्न करत असताना त्याला पुन्हा पकडून बेदम मारहाण करत त्याचे कपडे फाडले आणि नग्न अवस्थेत मारहाण केली तर एवढ्यावरच न थांबता आरोपींनी त्याला गाडीवर बसवून खडका गावात नेत तेथे बस स्थानक ते घरापर्यंत पायी धिंड काढून तरुणाच्या आई-वडिलांना, नातेवाईकांना मारहाण करत धमकवण्यात आले.

या घटनेत तरुण हा जखमी झाला असून त्याच्या हाताला दुखापत झाली असल्याची माहिती आहे व त्याच्यावर जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून इतर संशयितांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com